जा.क्र.का.15/वामूदत-2016-17/ 307
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
नविन प्रशासकिय इमारत,
तळमजला,पुणे-1
दि. 31/03/2016.

**आदेश**

**विषय:-** सन 2016 -17 साठी स्थावर मालमत्तेच्या वार्षिक मूल्य दर तक्त्यांना मंजुरी देणेबाबत.

ज्याअर्थी, मुंबई मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम, 1995 च्या नियम 4(3) मधील सुधारणांनुसार दरवर्षी एप्रिल महिन्याच्या 1 तारखेस महाराष्ट्र राज्यातील सर्व भौगोलिक क्षेत्रासाठी स्थावर मालमत्तेचे वार्षिक मूल्यदर तक्ते प्रसिध्द करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी सन 2016 - 17 साठीचे वार्षिक मूल्यदर तक्ते सहसंचालक, नगर रचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तयार करुन मुख्य नियंत्रक महसुल प्राधिकारी यांचे मान्यतेकरिता उक्त नियम 4 च्या पोटनियम (1) अन्वये सादर केले आहेत;

त्याअर्थी उक्त नियमातील नियम क्र.4 (3) अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, रामास्वामी एन. मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे याव्दारे सन 2016 -17 या वर्षाकरिता महाराष्ट्र राज्यातील सर्व भौगोलिक क्षेत्राच्या स्थावर मालमत्तांच्या वार्षिक मूल्यदर तक्त्यांना मंजुरी प्रदान करीत आहे. सदर तक्ते दिनांक 1 एप्रिल, 2016 पासुन अंमलात येतील.

सदरचे वार्षिक मूल्य दर तक्ते नोंदणी विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर Online services या सदराखाली eASR या ठिकाणी Process येथे उपलब्ध राहतील.

31.3.16

( डॉ.रामास्वामी एन. )
मुख्य नियंत्रक महसुल प्राधिकारी तथा
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत :-

1) मा. सचिव (मदत व पुर्नवसन ) महसूल विभाग, मंत्रालय मुंबई - 32 यांना माहितीसाठी सादर.
2) वरिष्ठ तांत्रिक संचालक, एन.आय.सी. पुणे यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.

   सदर वार्षिक मूल्य दर तक्ते नोंदणी विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर Online services या सदराखाली eASR या ठिकाणी उपलब्ध करण्यात यावेत.
3) सहसंचालक, नगर रचना,मुल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
4) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.
5) उपसंचालक नगर रचना, मुंबई प्रदेश, मुल्यांकन, मुंबई
6) सहाय्यक संचालक नगर रचना, मूल्यांकन, पुणे/कोकण/नागपुर/नाशिक/औरंगाबाद/अमरावती.
7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे /कोकण /नागपुर/नाशिक/औरंगाबाद/लातूर/अमरावती.
8) सहाय्यक संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-32.
9) प्रशासकीय अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक, मुंबई शहर / मुंबई उपनगर जिल्हा.
10) सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी /सहजिल्हा निबंधक.

   सहजिल्हा निबंधक यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व दुय्यम निबंधकांना सन 2016-17 च्या संबंधित वार्षिक मूल्यदर तक्त्याची प्रत तात्काळ पुरवावी.